**<u>ठळक बातम्या</u>**

- स्वतंत्र भारताचे गव्हर्नर जनरल सी राजगोपालाचारी यांच्या पुतळ्याचं राष्ट्रपतींच्या हस्ते अनावरण/ राजाजी उत्सवाचं उद्घाटन

- भारताच्या विकासयात्रेत सहभागी होण्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं गुंतवणूकदार संस्थांना आवाहन

- महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अभिभाषणाने प्रारंभ

- दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात शोकप्रस्ताव सादर

**आणि**

- जम्मू काश्मीरमधे सुरक्षा दलांच्या कारवाईत जैश ए मोहम्मदच्या म्होरक्यासह ७ दहशतवादी ठार

**<><><><><>**

स्वतंत्र भारताचे पहिले आणि एकमेव गव्हर्नर जनरल चक्रवर्ती राजगोपालाचारी यांच्या अर्धपुतळ्याचं अनावरण आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात  झालं. अशोक मंडपाजवळच्या ग्रँड ओपन स्टेअरकेस भागात असलेल्या एडविन लुटियन्स यांच्या अर्धपुतळ्याच्या जागी आता राजगोपालाचारी यांचा पुतळा स्थानापन्न झाला आहे. चक्रवर्ती राजगोपालाचारी यांना सन्मानित करून आपण भारताच्या आत्मगौरवाचा सन्मान केला आहे. आज राष्ट्रपती भवन या नावाने ओळखली जाणारी वास्तू हे त्यांचं तत्कालीन शासकीय निवासस्थान होतं. या निवासस्थानी आल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम महात्मा गांधी आणि रामकृष्ण परमहंसांची छायाचित्रं इथे लावली. त्यांची ही कृती वसाहतवाद मागे सोडून भारत आता स्वातंत्र्याच्या पूर्णत्वाकडे निघाल्याचं प्रतीक होती, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यावेळी म्हणाल्या.

या अनावरण सोहळ्याला उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा, डॉ. एस. जयशंकर, धर्मेंद्र प्रधान, गजेंद्र सिंह शेखावत, डॉ. एल. मुरुगन आणि चक्रवर्ती राजगोपालाचारी यांचे कुटुंबीय उपस्थित होते. राष्ट्रपती भवनात आजपासून राजाजी उत्सवाचं आयोजन करण्यात आलं असून हा उत्सव येत्या १ मार्चपर्यंत सुरू असेल.

**<><><><><>**

भारताच्या विकासयात्रेत सहभागी व्हावं असं आवाहन  केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संस्थात्मक गुंतवणूकदारांना केलं आहे.  केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर झाल्यानंतरच्या पत्रकार परिषदेत रिझर्व बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्यासह  त्या बोलत होत्या. बँकांनी आपल्या मुख्य कामावर लक्ष केंद्रीत करावं असा सल्ला त्यांनी बँकांनी चालवलेल्या विमा योजनांसंदर्भात दिला. सोनं चांदीची वाढती आयात चिंताजनक पातळीवर नसल्याचं सांगितलं.

चालू खात्यातली तूट आवाक्यात असल्याचं रिझर्व बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितलं. सध्या देशात भांडवल टंचाई नाही असं ते एका प्रश्नाच्या  उत्तरात म्हणाले.

**- -  होल्ड – बाईट- गव्हर्नर - - -**

**<><><><><>**

इंडिया एआय इम्पॅक्ट परिषद २०२६मध्ये स्वीकारण्यात आलेल्या एआय इम्पॅक्टवरील दिल्ली जाहीरनाम्याला ८९ देश आणि आंतरराष्ट्रीय संघटनांनी मान्यता दिली आहे. आर्थिक विकास आणि सामाजिक हितासाठी एआयचा वापर करण्याबाबत सहमती यांतून स्पष्ट होते. मान्यता देणाऱ्या देशांमध्ये बहुतांश सर्व मोठ्या अर्थव्यवस्था, तसंच आशियाई आणि अरब देशांचा समावेश आहे.

**<><><><><>**

देशातली पहिली सहकारी कॉल टॅक्सी सेवा भारत टॅक्सीच्या सदस्य चालकांशी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी आज नवी दिल्ली इथं संवाद साधला. या सेवेचं उद्दिष्ट चांगली सेवा देण्याबरोबरच टॅक्सी चालकांचं हित साधणं असं असल्याचं शहा यांनी स्पष्ट केलं. भारत टॅक्सी सेवेवर चालकांसाठीही ऑनलाईन तक्रार नोंदवण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल, असं ते म्हणाले.

**- - होल्ड- बाईट- अमित शहा - - -**

**<><><><><>**

केंद्रीय नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आज चैन्नई इथे बंदरांशी संबधित विविध प्रकल्पांचं उद्घाटन केलं. तुतीकोरीन इथं व्ही ओ चिदंबरम सागरी परंपरा वस्तुसंग्रहालया बरोबरच ८ मेगावॅट पवनउर्जा संयत्र तसंच ५ मेगावॅट बॅटरी साठवणूक व्यवस्था अशा १५०० कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांचं भूमीपूजनही सोनोवाल यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

झारखंडमधे आज ४८ नगरपालिकांच्या निवडणुकीसाठी मतदान होत आहे. सकाळी ७ ते ९ या वेळेत अंदाजे ११ टक्के मतदान झाल्याचं वृत्त आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आज राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अभिभाषणाने सुरुवात झाली. यावेळी राज्यपालांनी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राज्य सरकारच्या कामगिरीचा आढावा मांडला. सकल देशांतर्गत उत्पादनात महाराष्ट्राचं योगदान १३ पूर्णांक ५ दशांश टक्के असून देशात सर्वात जास्त विदेशी गुंतवणूक आकर्षित करणारं राज्यही महाराष्ट्रच आहे, असं राज्यपाल म्हणाले. २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहीत ९१ हजार ३२७ कोटींची गुंतवणूक राज्यात आली, त्यामुळे महाराष्ट्र हे उद्योगधंद्यात अग्रगण्य राज्य असल्याचं त्यांनी नमूद केलं. यावर्षी जानेवारी महिन्या दावोस इथं झालेल्या जागतिक परिषदेत राज्य सरकारने विविध देशांमधल्या १८ कंपन्यांसोबत तीस लाख कोटींचे करार केले, यामुळे ४० लाख रोजगार निर्माण होणार आहेत, असं राज्यपालांनी सांगितलं. उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारने आखलेल्या विविध धोरणांची माहिती यावेळी राज्यपालांनी दिली.

राज्यातल्या कृषी क्षेत्राच्या विकासालाही सरकारनं प्राधान्य दिलं आहे, त्यासाठी मागेल त्याला सौरपम्प, मोफत वीजबिल योजना आदी योजना राबवल्या जात आहेत, असं राज्यपाल म्हणाले. महिला, आदिवासी, मागास समुहाच्या प्रगतीसाठी सरकार वचनबद्ध असल्याचं सांगत या सर्व घटकांसाठी सरकार राबवत असलेल्या धोरणांची माहिती राज्यपालांनी दिली.

**त्यानंतर** विधानसभेचं कामकाज सुरू झालं तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडला. अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडणं हा आपल्यासाठी भावनिक क्षण आहे, पवारांसारख्या सहकाऱ्याचं निधन होणं ही केवळ राजकीय हानी नाही तर वैयक्तिक प्रचंड वेदना देणारी बाब आहे, अशी भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी अजित पवार यांच्याविषयीच्या अनेक आठवणी जागवल्या.

त्याआधी मुख्यमंत्र्यांनी उप मुख्यमंत्री तथा राज्य उत्पादन शुल्क मंत्री सुनेत्रा पवार यांची सभागृहाला ओळख करून दिली.

विधानपरिषदेत उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला.

**<><><><>**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची सीबीआय चौकशी करण्याच्या सूचना देण्याची विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना केली आहे. मुंबईत वार्ताहर परिषदेत फडणवीस यांनी ही माहिती दिली. या अपघाताविषयी असलेल्या सर्व शंका दूर करण्यासाठी सरकार प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितलं. या संदर्भात महायुतीतील मित्र पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसकडून या अपघाताची सीबीआय चौकशीची मागणी करणारे पत्र मिळाल्याचं सांगून या संदर्भात केंद्रीय गृह मंत्र्यांशी चर्चा झाल्याचे ते म्हणाले.

**<><><><>**

'बुंग' या मणीपुरी चित्रपटाने सर्वोत्कृष्ट बाल आणि कौटुंबिक फिल्म या गटात बाफ्टा पुरस्कार पटकावला आहे. बाफ्टा अर्थात ब्रिटीश अकादमी फिल्म आणि टेलिविजन आर्ट्स पुरस्कार काल लंडन इथं जाहीर झाले. मणीपुरी भाषेतल्या बुंग या शब्दाचा अर्थ छोटा मुलगा. सामाजिक आणि राजकिय अस्वस्थ वातावरणात वाढत असलेल्या एका बालकाची कहाणी हा चित्रपट सांगतो. या चित्रपटाने टोरांटो फिल्म फेस्टीवल, मेलबर्नमध्ये भारतीय चित्रपट महोत्सव अशा अनेक महोत्सवात वाहवा मिळवली आहे.

**<><><><>**

जम्मू-काश्मीरमध्ये किश्तवाड जिल्ह्याच्या चत्रू भागात सुरक्षादलांच्या संयुक्त कारवाईत सात दहशतवादी ठार झाले. गुप्तवार्ता विभागाकडून जैश-ए-मोहम्मद या संघटनेशी संबंधित दहशतवादी लपून बसल्याची माहिती मिळाल्यावर लष्कर, जम्मू-काश्मीर पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दलानं संयुक्तपणे ही मोहीम राबवली. जैश ए मोहम्मदचा म्होरक्या सैफुल्ला या कारवाईत गारद झाला असून, दोन AK-47 रायफल्ससह मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आल्याचं सुरक्षा दलांच्या सूत्रांनी सांगितलं.

<><><><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज झिंबाब्वे विरुद्ध वेस्ट इंडीज हा सामना मुंबईतच्या वानखेडे स्टेडीयमवर होणार आहे. सामना संध्याकाळी ७ वाजता सुरु होईल.

काल अहमदाबाद इथं झालेल्या सुपर एट सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या संघानं भारतीय संघाचा ७६ धावांनी पराभव केला. श्रीलंकेत पल्लेकेले आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या गट २ मधील आणखी एका सुपर एट सामन्यात इंग्लंडनं श्रीलंकेवर ५१ धावांनी विजय मिळवला.

गुण तालिकेत आता दक्षिण आफ्रिका, इंग्लंड प्रत्येकी दोन गुण मिळवून पुढे आहेत. न्यूझीलंड आणि पाकिस्तानला प्रत्येकी एक गुण मिळाला आहे.

//<><><><><>//